# डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
# जिल्हा रत्नागिरी

जाक्र डॉ.बासाकोकृवि/बांधकाम/अे–७/१२७/२०१९ दिनांक : ११/०१/२०१९

## निविदा सूचना

विद्यापीठ अभियंता, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, तालुका दापोली जिल्हा रत्नागिरी यांचेकडून **३८ व्या पदवीदान** समारंभाकरिता खालील कामासाठी **''ड'' नमुन्यामध्ये** (सुट्टीचे दिवस सोडून) कार्यालयीन वेळेमध्ये मोहोरबंद निविदा मागविण्यांत येत आहेत. सर्व सीलबंद निविदापत्रिका दापोली येथे विद्यापीठ अभियंता, डॉ.बा.सा.को.कृ.वि. दापोली यांचे कार्यालयात स्विकारल्या जातील व शक्य झाल्यास त्याच दिवशी ठेकेदार किंवा ठेकेदारांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडणेंत येतील.

| अ. क्र. | कामाचे नांव | इसाऱ्याची रक्कम रूपये | निविदा फॉर्म विक्रीचा कालावधी | निविदा सादर करावयची अंतिम तारीख व वेळ | निविदा उघडण्याची तारीख व वेळ | निविदा पत्रिकेची किमत रूपये | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोलीचा ३८ व्या पदवीदान समारंभोकरीता मंडप उभारणे व सजावटीची इतर कामे करून देणे.** | १४००/– | १७.०१.१९ ते २५.०१.१९ रोजी दुपारी १५.०० वाजे पर्यत | २९.०१.१९ रोजी १५.०० वाजे पर्यत | २९.०१.१९ रोजी १६.०० वाजे पर्यत | २००/– | **पदवीदान समारंभाचे पुर्वी २४ तास अगोदर** |

**टिप:** १. तांत्रिक व आर्थीक देकार उघडणे संदर्भातील दिनांकाबाबतची चौकशी कृपया विद्यापीठ अभियंता, डॉ.बा.सा.कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी **(फोन नं. ०२३५८–२८२४११, १२, १३)** कार्यालयाकडे करण्यात यावी.

१. कोऱ्या निविदा पत्रिकेची मागणी लेखी स्वरूपात करणे आवश्यक असून **कोऱ्या निविदा पत्रिकेचे मागणीचे वेळी फक्त व्यवसाय परवाना पत्र सत्य प्रत** सादर करावी आणि **सिलबंद निविदा बंद पेटीमध्ये सादर करतेवेळी** खालीलप्रमाणे कागदपत्रांच्या सत्य प्रती सादर करणे बंधनकारक आहे.

१ व्यवसाय परवाना पत्र.
२ जी.एस.टी. प्रमाणपत्र.
३ पॅनकार्ड.
४ शासकीय व निमशासकीय विभांतर्गत मंडप उभारणी या प्रकारची कामे केल्याचे संबधीत विभागाने दिलेली यादी/प्रमाणपत्रे व त्यांचे फोटो.

**कंत्राटदार/कंपनीने प्राधीकृत केलेल्या व्यक्तीकडेच निविदा फॉर्म देण्यात येतील.**

सविस्तर निविदा सूचना विद्यापीठ अभियंता यांचे कार्यालयात किंवा www.dbskkv.org या वेबसाईटवर पहावयास मिळेल.

सहि/–
विद्यापीठ अभियंता

# सर्व साधारण अटी

१) बयाणा रक्कम धनाकर्षाद्वारे (डी.डी) स्विकारणेत येईल. धनाकर्ष हा डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, यांचे नावे स्टेट बँक ऑफ इंडीया, दापोली, सेन्ट्रल बँक ऑफ इंडीया, बँक ऑफ इंडिया किंवा रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक या बँकेवरील असावा. सदरचा धनाकर्ष हा **Payabal at Dapoli** असणे आवश्यक आहे. निविदे सोबत बयाणा रक्कमेचा धनाकर्ष दापोली वरील नसल्यास निविदा उघडण्यात येणार नाही.

२) बयाणा रक्कमेचा धनादेश लखोटा नं. १ मध्ये बंद करावयाचा आहे. तसेच मुख्य निविदा फॉर्म लखोटा नं २ मध्ये सिलबंद करावयाचा आहे. असे दोन सिलबंद लखोटे एका स्वतंत्र लखोटयात सिलबंद करून सादर करण्यात यावेत.

३) विद्यापीठात काम घेताना बयाणा रक्कम / सुरक्षा अनामत रक्कम भरणेबाबत सुट मिळणार नाही.

४) निविदा अर्ज विक्री अथवा निवीदा स्विकृती अथवा निविदा उघडण्याच्या तारखेला सुटी जाहीर झाली असल्यास त्या दिवसाचे कामकाज लगतच्या कामकाजाच्या दिवशी पार पाडणेत येईल.

५) निविदे सोबत सादर केलेली सर्व कागदपत्रे **सत्य:प्रत केलेली असावित** स्वसाक्षांकीत नसावीत.

६) अधिक माहितीसाठी विद्यापीठ अभियंता डॉ.बा.सा.को.कृ.वि. दापोली यांच्याशी कामाचे दिवशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

७) ज्या ठेकेदाराची निविदा स्विकारण्यात येईल त्या ठेकेदारास रू.१००/— मात्रचे कोर्ट फी स्टॅम्पवर करारनामा करून द्यावा लागेल.

८) कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कोणत्याही स्तरावर नामंजूर करण्याचा हक्क या कार्यालयाने राखून ठेवलेला आहे

९) निविदेमध्ये दर नमूद करताना सर्व करांचा समावेश (उदा.वाहतूक, जी.एस.टी., एक्ससाईज डयुटी, जकात, चढणावळ, उतरणावळ, पोहोच इ.) करणेत यावा.

१०) निविदेमधे नमुद केलेले काम कमी/ जास्त होण्याची शक्यता आहे किंवा संपुर्ण किंवा एखादे काम रद्दही करणेत येईल. प्रत्यक्षात केलेल्या कामाचेच देयक अदा केले जाईल.

११) आदेशीत केलेले काम पुर्ण झाल्याशिवाय कोणत्याही प्रकारचे पेमेंन्ट अदा केले जाणार नाही.

१२) खालील निर्देशित केलेल्या शासकीय करांची कंत्राटदाराच्या देयकामधून वेळोवेळी कपात केली जाईल.

a) G.S.T. – **शासनाचे निर्देशानुसार जी.एस.टी. कराची टक्केवारी ठेकेदाराचे देयकामधून वजावट करणेत येईल व हे ठेकेदारावर बंधनकारक राहील.**

b) Income Tax – As per rates fixed by Income Tax Department, Govt. of India

c) Labour Insurance – 0.5/1.0% will be deducted from the bills

d) Labour Ces – 1.0 % will be deducted from the bills.

१३) भरलेल्या दराची मुदत १२० दिवसांपर्यत अमलात राहील तसेच अटीयुक्त निविदा स्विकारली जाणार नाही.

१४) निविदापत्रकामध्ये खाडाखोड, बदल किंवा नमुद केलेल्या दराचे व रक्कमेचे आकडे गिरवणे इ.गोष्टी आढळुन आल्यास सदरची निविदा रद्द केली जाईल.

१५) ३८ वा पदवीदान समारंभ कार्यक्रम महत्वपूर्ण असल्याने वरीलपैकी सांगणेत येणारी कामे सुरक्षिततेच्या दृष्टीने समारंभापुर्वी २४ तास अगोदर पूर्ण करावयाची आहेत. मात्र दर आकारताना २४ तास अगोदर गृहित धरून फक्त एका दिवसाचे देयक अदा करणेत येईल. तसेच मंडप डेकोरेशनसाठी वापरणेत येणारे कापड स्वच्छ असणे आवश्यक आहे. सदर समारंभाच्या तारखेमध्ये काही बदल झाल्यास त्याबाबतची पुर्व कल्पना मंडप धारकास देण्यात येईल. त्याकरीता जादा दर दिले जाणार नाहीत.

१६) ध्वनीक्षेपणात काही अडचण येऊन कार्यक्रमात अडथळा निर्माण झाल्यास, त्या बाबीतील रक्कमेच्या २५ टक्के रक्कम कपात करणेत येईल.

१७) ठेकेदाराने त्यांचे कामावर नेमणेत येणाऱ्या मजूरांचे विमा उतरविणे बंधनकारक आहे. त्या पोटी त्यांनी आवश्यक ते प्रमाणपत्र सादर करावयाचे आहे. प्रमाणपत्र सादर न केल्यास शासनाने विहित केलेल्या नियमांनुसार बीलामधून ०.५ टक्के रक्कमेची वजावट करणेत येईल याची नोंद घ्यावी.

१८) मंडपासाठी वापरण्यात येणारे सर्व कापड जाड, स्वच्छ, उत्तम प्रतीचे आणि दिमाखदार असणे आवश्यक आहे.

१९) **मंडप उभारणीकरीता ग्रामपंचायत/नगरपंचायत तसेच अन्य शासकीय संस्था इत्यादीच्या आवश्यक त्या परवानग्या मंडपधारकाने आपल्यास्तरावर घेणे बंधनकारक राहील याकरीता कोणत्याही स्वरूपाच्या शुल्काची आदायगी या कार्यालयामार्फत केली जाणार नाही.**

**सहि/—**
**विद्यापीठ अभियंता,**
**डॉ.बाळासाहेब सावंत कोकण**
**कृषि विद्यापीठ,दापोली**

**प्रत, विद्यापीठ कार्यकारी परिषदेचे सर्व सन्माननीय सदस्यांना माहितीसाठी सविनय सादर.**

१) मा. कुलगुरू महोदय यांचे स्वीय सहाय्यक,डॉ बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांना माहितीसाठी सविनय सादर
२) शिक्षण संचालक, डॉ बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
३) नियंत्रक, डॉ बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,दापोली
४) सहा. अभियंता, मध्य उपविभाग बांधकाम, डॉ बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
५) श्री.जी.आर.मोहिते, शाखा अभियंता, डॉ बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
६) प्रभारी अधिकारी,कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष,डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,दापोली जि.रत्नागिरी
२/— यांना कळविण्यात येते की,सदरची निविदा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.
७) नोटीस बोर्ड डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली